• बीड (महाराष्ट्र) • वर्ष ३ रे • अंक २८६ • मंगळवार,दि.१६ जानेवारी २०२४ • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • पान १ • पाने ४ • किंमत ३ रूपये
• Beed (Maharashtra) • Year 3 • Issue 286 • Tuesday 16 Janewari 2024 • RNI-MAHMAR/2021/80074 • Post: Reg.No.L/164/RNP/Beed/2022-24 • Page1 • Pages 4 • Price 3




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
| बीड | छत्रपती संभाजीनगर | जालना | लातूर | परभणी | धाराशिव | हिंगोली | नांदेड | नगर


# मराठवाडा पत्र

संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे




बीड • dailymarathwadapatra2021@gmail.com • https://marathwadapatra.com • https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# अधिवेशन बोलवा अन कायदा करा - जरांगे पाटील



**जालना । वृत्तसंस्था**

अधिवेशन बोलवून त्यात कायदा पारित करा. त्यांचे म्हणणे होते की, फेब्रुवारी महिन्यापर्यंत जाईल. पण त्यांना नाही म्हणालो आहे. हे चर्चेचे गुऱ्हाळ चालत राहणार आहे. वेळकाढूपणा होऊ शकतो. आपण सावध राहायला हवे. त्यामुळे २० तारखेला मुंबईला जाणारच. मुंबईला गेल्यावर चर्चा सगळी बंद होईल. मग सगळे सोयीस्कर होईल. सरकार जर सुतासारखे सरळ करायचे असेल, सरकारला आडमुठी भूमिका सोडायला लावायची असेल, तर मराठ्यांना २० तारखेला मुंबईकडे जावेच लागेल, असे मनोज जरांगे पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले. मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे आंदोलन करत आहेत. २० तारखेला मराठा समाजातील बांधव मुंबईकडे कूच करणार आहेत. कोट्यवधी मराठा आंदोलक मुंबई धडकणार असल्याचा दावा मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. मीडियाशी ▶▶ पुढील पानावर

## रश्मी ठाकरे सक्रीय राजकारणात उतरणार?

**मुंबई । वृत्तसंस्था**

राज्यात निवडणुकीचे वारे वेगाने वाहत आहे. त्यात शिवसेनेत पडलेल्या फुटीनंतर उद्धव ठाकरेंच्या हातून पक्षाचे नाव आणि चिन्ह दोन्ही निसटले आहे त्यामुळे ठाकरे गट सर्वच पातळीवर विरोधकांवर प्रहार करण्याची रणनीती आखत आहे. त्यात प्रामुख्याने उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे राज्यभरात दौरे करत आहेत. पक्षाच्या शाखांना भेटी देत आहेत. त्यातच आता रश्मी ठाकरे यांनीही ठाकरे गटाची महिला आघाडी मजबूत करण्यासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. अलीकडच्या काळात ठाकरे गटातून नीलम गोऱ्हे, मनिषा कायंदे यांच्यासारखे प्रमुख चेहरे एकनाथ शिंदेंसोबत गेले. त्यामुळे महिला आघाडीची ताकद काहीशी कमी झाली. मात्र नवीन नेतृत्वासोबत ठाकरे गटाची महिला आघाडी भरारी घेण्याच्या तयारीत आहेत. याबाबत ठाकरे गटाच्या उपनेत्या संजना घाडी म्हणाल्या



की, आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सगळेच राजकीय पक्ष तयारीला लागलेत. त्यात उद्धव ठाकरे गटानेही महिला मतदारांची ताकद पाहून स्त्री शक्ती संवाद मोहिम हाती घेतली आहे. महाराष्ट्रातील २३ लोकसभा मतदारसंघातील महिला पदाधिकारी आणि महिला शिवसैनिकांशी चर्चा केली जाणार आहे. गद्दारी आणि गटतटाच्या राजकारणाची झळ ▶▶ पुढील पानावर

## तरुणावर प्राणघातक हल्ला

**केज । प्रतिनिधी**

जुन्या भांडणाचा राग मनात धरून एका १८ वर्षीय तरुणावर धारदार कत्ती, चाकू आणि लोखंडी रॉडने डोके, हातावर वार करीत छातीवर दगडाने मारहाण करून प्राणघातक हल्ला केल्याची घटना उत्तरेश्वर पिंप्री ( ता. केज ) येथे घडली. जखमी तरुणावर अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात उपचार सुरू असून याप्रकरणी सात जणांविरुद्ध केज पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. उत्तरेश्वर पिंप्री येथील अभिषक महादेव दातार ( वय १८ ) हा तरुण केज येथील तांबवेश्वर महाविद्यालयात बीएससी. प्रथम वर्षाचे शिक्षण घेत असून मागील दोन महिन्यापुर्वी गावातील आशिष किसन मस्तुद, अभिषेक बारीकराव चंदनशिव, प्रतिक तुकाराम शिंदे, अविष्कार आशोक उघडे यांच्यासोबत गावातील महादेव मंदीराच्या चौकात बोलण्या - बोलण्यावरुन मारामारी झाली होती. गावचे सरपंचासह नागरिकांनी मध्यस्थी करून त्यांचे भांडण ग्रामपंचायतीत मिटविले होते. या भांडणाचा राग मनात धरून अभिषेक यास गावातून जाता येता शिव्या देणे, अंगावर थुंकणे असे प्रकार सुरू होते. १२ जानेवारी रोजी ही गावातील जि. प. शाळेच्या पाठीमागे शेतात क्रिकेट खेळत असताना प्रतिक शिंदे याने आमच्या दारात ▶▶ पुढील पानावर





## हिट अँड रन जाचक कायद्यात बदल करा -आ.संदीपभैय्या

बीड : केंद्र सरकारच्या हिट अँड रन या जाचक कायदाच्या विरोधात बीड शहरात सर्व ड्रायव्हर -चालक मालक संघटनेच्या वतीने भव्य एल्गार मोर्चा काढण्यात आला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला अभिवादन करून भारतरत्न डॉ. आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते जिल्हाधिकारी कार्यालय बीड पर्यंत आयोजित या भव्य मोर्चामध्ये सहभागी होऊन सामान्य, गरीब, कष्टकरी चालकांच्या बाजूने उभे राहून त्यांच्या मागणीला पाठिंबा देण्याची भूमिका घेतली. देशभरातील चालकांचा या कायद्याला विरोध असून केंद्र सरकारने या चालकांची भावना व भूमिका समजून घेवून या कायद्यामध्ये बदल किंवा सुधारणा करण्याची भूमिका घ्यायला हवी, या मागणीचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना आ.संदीपभैय्यांच्या उपस्थित देण्यात आले.

## मराठा आरक्षणासाठी धाराशिव ते तुळजापूर महावाहन रॅली

**धाराशिव । वृत्तसंस्था**

मराठा आरक्षणाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी 'चलो मुंबई'ची हाक दिली आहे. त्यानुषंगाने शहरांसोबतच गावोगावी बैठकांच्या माध्यमातून तयारी सुरू आहे. त्याचाच भाग म्हणून मंगळवारी धाराशिव ते तुळजापूर अशी महावाहन रॅली काढण्यात येणार आहे. सकल मराठा समाजाच्या वतीने सोमवारी ही घोषणा केली. मराठा आरक्षणाचे




नेते मनोज जरांगे पाटील यांच्या नेतृत्वात हक्कासाठी संघर्ष सुरू आहे. २० जानेवारी रोजी मुंबईच्या दिशेने कूच करण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. त्यानुषंगाने मागील काही दिवसांपासून जिल्ह्यातील गावागावांत बैठका घेऊन तयारी करण्यात येत आहे. मुंबईला जाण्यासाठीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. त्याचाच भाग म्हणून मंगळवारी धाराशिव ते तुळजापूर अशी महारॅली काढण्यात येणार आहे. ही रॅली शहरातील छत्रपती शाहु महाराज चौक (तेरणा कॉलेज) ▶▶ पुढील पानावर

## जागेच्या वादातून परळीत दोन गटात वाद

**परळी । वृत्तसेवा**

शहरातील मोंढा विभागात मकर संक्रातीसाठी सुगडे विकण्यास बसलेल्या उद्धव कुंभार यास जागेच्या कारणावरून मोंढयातील फळ विक्रेत्यांच्या गटाने रविवारी रात्री ८.३० च्या सुमारास जबर मारहाण केली. मध्यस्थी करण्यास गेलेल्यांना देखील मारहाण झाल्याने बाजारपेठेत एकच गोंधळ उडाला. दरम्यान या प्रकरणी ३० जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनास्थळास रात्री बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, आंबेजोगाई च्या अतिरिक्त जिल्हा पोलीस अधीक्षक तिडके मॅडम अंबाजोगाईचे उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले यांनी भेटी दिल्या आहेत. येथील राणी लक्ष्मीबाई टावर ते मोंढा मार्केट दरम्यान रस्त्यावर फळ विक्रेते व इतर वाण विक्रीचे गाडे लावण्यात आले ▶▶ पुढील पानावर

## मोदींना एकत्रितपणे 'घोंचू' म्हणण्याचा सल्ला -आंबेडकर

**मुंबई । वृत्तसंस्था**

वंचित बहुजन आघाडीचे राष्ट्रीय अध्यक्ष ड प्रकाश आंबेडकरांनी काल ट्विटरच्या माध्यमातून मालदीव - भारत विषयावर टिप्पणी करत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर निशाणा साधला होता. यात त्यांनी मोदींचा घोंचू म्हणून शब्दोल्लेख केला होता. याच पार्श्वभुमीवर पुन्हा एक ट्विट केले आहे. मोदी आणि त्यांच्या पक्षाने वेळोवेळी काही विरोधी नेत्यांची



अपमानास्पद नावे घेऊन खिल्ली उडवली आहे. काल मी मोदींना घोंचू म्हटले. आम्ही प्रस्तावित करतो की तुम्ही हा शब्द घ्या आणि एकत्रितपणे त्याला घोंचू म्हणा. असा सल्ला त्यांनी या माध्यमातून दिला आहे महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीत सहभागी होण्यासाठी वारंवार पत्र पाठवून ही तुम्ही अजूनही आमचा पक्ष (वंचित बहुजन आघाडी) चा समावेश करून घेऊ शकला नाही, तरी आम्ही तुम्हाला मदत करू अशी इच्छा ही त्यांनी यातून व्यक्त केली आहे.



# आ.संदिपभैय्यांच्या हस्ते मुकनायक पुरस्काराचे वितरण

**माजलगाव । प्रतिनिधी**

येथील माजलगाव एकता पत्रकार संघाच्या दि १८ रोजी होणाऱ्या मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळ्याला जेष्ठ पत्रकार, राजकीय विश्लेषक राहीताई भिडे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित राहणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बीडचे आमदार संदीप क्षीरसागर यांची उपस्थिती लाभणार आहे,अशी माहिती संयोजक ज्योतिराम पांढरपोटे यांनी दिली. माजलगाव एकता पत्रकार संघाच्या मूकनायक आणि माजलगाव भूषण सन्मान सोहळा, गुरुवार दि १८ जानेवारी २०२४ रोजी मॉ.वैष्णवी मंगल कार्यालयात सकाळी ११:०० वाजता रंगणार आहे. मुकनायक पुरस्कारासाठी निर्भीड पत्रकार, आरोग्यदुतचे संपादक बाबा श्रीहरी देशमाने, बीड येथील दै. मराठवाडा पत्रचे संपादक दत्तात्रय नरनाळे यांना प्रदान करण्यात येणार आहे. माजलगाव भुषण पुरस्कार कुषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नितीनराव नाईकनवरे,ड. भानुदास डक,रविंद्र कानडे,रामराजे रांजवण,डॉ.गणेश आगे,सरपंच सौ. सिमाताई सोळंके,इम्रान ताहेर सलीम खान, तलाठी सुर्यकांत गवई, ग्रामसेवक महेश गेंदले यांना प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्कार वितरण सोहळ्याला महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे,शिवसेना अल्पसंख्याक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सईद खान,बहुजन विकास मोर्चाचे अध्यक्ष बाबुराव पोटभरे,माजी आमदार मोहनराव काका सोळंके,माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील,आ.प्रकाश सोंळके,भाजप नेते रमेशराव आडसकर, मोहनराव जगताप, उद्योजक विजयकुमार वाव्हळ,लोकपत्रकार भागवत तावरे जिल्हाधिकारी, पोलिस अधीक्षक नंदकुमार ठाकुर व सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलिस अधिकारी बी.धिरजकुमार आदींसह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत असून या कार्यक्रमाला माजलगाव तालुक्यातील व शहरातील नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन माजलगाव एकता पत्रकार संघाच्यावतीने संयोजक,पत्रकार ज्योतिराम पांढरपोटे,वाजेद पठाण,अमर साळवे, राजेभाऊ पाष्टे,नय्युम आत्तार,वसंत परसे, बालासाहेब उफाडे यांनी केले आहे. माजलगाव शहरातील भूमिपुत्र राज्यात विविध वरीष्ठ पदावर अधिकारी म्हणुन कार्यरत असलेले व राज्यातील विविध भागात माजलगावचा नावलौकिक करणारे अहमदनगर महानगरपालिकेचे आयुक्त डॉ. पंकजकुमार वसंतराव जावळे, यवतमाळ जिल्ह्यातील नेर तालुक्याचे तहसीलदार डॉ. शिवाजी रामेश्वर मगर व परळी येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागात सहायक अभियंता-श्रेणी-२ म्हणून कार्यरत असलेल्या ईंजी. दिपाली रामदास गिते यांचाही या कार्यक्रमात विशेष गौरव होणार असुन त्यांना माजलगाव भुषण पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

संपादकीय

# इंडिया आघाडी भाजपला हद्दपार करणार

भाजप आघाडीला आगामी लोकसभा निवडणुकीमध्ये आव्हान देण्यासाठी स्थापन झालेल्या सर्व विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व काँग्रेस पक्षाकडे आले आहे. काँग्रेसचे ज्येष्ठ नेते मल्लिकार्जुन खर्गे यांना या आघाडीचे अध्यक्षही करण्यात आले आहे. काँग्रेस पक्षासाठी ही आनंदाची आणि समाधानाची बाब असली, तरी त्याचवेळी या जबाबदारी पाठोपाठ येणारी आव्हानेही काँग्रेसला आणि मल्लिकार्जुन खर्गे यांना लक्षात घ्यावी लागणार आहेत. गेल्या शनिवारी 'इंडिया' आघाडीची जी बैठक झाली त्याला काही प्रमुख घटक पक्षांनी पाठ फिरवली होती. खरे तर इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे लोकसभा निवडणुकीतील जागावाटप निश्चित करण्यासाठी ही बैठक बोलवण्यात आली होती; पण या बैठकीत हा निर्णय होऊ शकला नाही. मात्र या आघाडीचे नेतृत्व काँग्रेस आणि मल्लिकार्जुन खर्गे यांच्याकडे आल्यामुळे आता आगामी कालावधीमध्ये होणार्या बैठकांमध्ये जागा वाटपावर तोडगा काढण्याचे मोठे आव्हान काँग्रेसला स्वीकारावे लागणार आहे. काँग्रेस हा देशातील सर्वात जुना आणि मोठा पक्ष असला तरी या पक्षाची विद्यमान कामगिरी लक्षात घेता या पक्षाने थोडी पडती बाजू घ्यायला हवी, असे स्पष्ट मत तृणमुल काँग्रेसच्या नेत्या आणि पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी व्यक्त केले होते. पश्चिम बंगालसारख्या मोठ्या राज्यामध्ये काँग्रेसला फक्त दोन जागा देण्याची तयारी ममता बॅनर्जी यांनी दाखवली होती. त्याचवेळी पश्चिम बंगालमध्ये कायदा व सुव्यवस्था लक्षात घेता या राज्यात राष्ट्रपती राजवट जाहीर जारी करावी, अशी मागणी काँग्रेसचे नेते अधिर रंजन चौधरी यांनी केली आहे. साहजिकच इंडिया आघाडीचे नेतृत्व जरी काँग्रेसकडे आले असले तरी घटक पक्षांना व्यवस्थितपणे सांभाळण्याचे मोठे काम आता काँग्रेस नेतृत्वाला करावे लागणार आहे. या सर्व आघाडीतील घटक पक्षांची मोळी बांधत असताना त्या प्रत्येकाचे समाधान कसे होईल हे काँग्रेसला पाहावे लागणार आहे. ममता बॅनर्जी यांनी म्हटल्याप्रमाणे काही वेळा काँग्रेसला पडती भूमिका घ्यावी लागणार आहे. उत्तरप्रदेशसारख्या मोठ्या आणि महत्त्वाच्या राज्यामध्ये काँग्रेसची अवस्था अत्यंत वाईट आहे. त्या ठिकाणी जागा वाटपामध्ये मोठा वाटा काँग्रेसला मिळवण्याची कोणतीही शक्यता नाही. या राज्यामध्ये अत्यंत प्रभावशाली असलेला अखिलेश यादव यांचा समाजवादी पक्षही जागा वाटपामध्ये काँग्रेसबाबत तडजोडीची भूमिका घेईल असे वाटत नाही. बिहारमध्येसुद्धा तशीच परिस्थिती आहे. नितीशकुमार यांचा संयुक्त जनता दल आणि लालू प्रसाद यादव यांचा राष्ट्रीय जनता दल यांचे आघाडीचे सरकार या राज्यात असल्यामुळे लोकसभा निवडणुकीमध्ये जागा वाटपामध्ये मोठा वाटा याच पक्षांना मिळणार आहे. बिहारमध्येही काँग्रेसचा प्रभाव कमी झाल्यामुळे या राज्यातही काँग्रेसला पडतीच भूमिका घ्यावी लागणार आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यामध्येसुद्धा निवडून येणार्या खासदारांच्या सूत्रावर जर उमेदवारी देण्याचा विषय समोर आला तर काँग्रेसचा मागच्या वेळी फक्त एकच खासदार निवडून आला असल्यामुळे या राज्यामध्येसुद्धा जागा वाटपाचा विषय काँग्रेससाठी डोकेदुखीचा ठरणार आहे. गुजरात, राजस्थान, कर्नाटक, मध्यप्रदेश यासारख्या राज्यांमध्ये भाजप आणि काँग्रेस या दोन राष्ट्रीय पक्षांमध्येच नेहमी सरळ सरळ लढत होत असल्यामुळे या राज्यांमधील जागावाटपामध्ये काँग्रेसची बाजू जरी वरचढ ठरणार असली, तरी केंद्रात कोणाचे सरकार स्थापन होणार हे ठरवण्यामध्ये महत्त्वाची भूमिका घेणार्या उत्तर प्रदेश, बिहार, पश्चिम बंगाल या राज्यांमधील जागावाटपाचा विषय मात्र काँग्रेससाठी आव्हानात्मक ठरणार आहे. एकीकडे नरेंद्र मोदी यांना आव्हान देण्यासाठी ही इंडिया आघाडी आकाराला आली असली तरी या आघाडीचा प्रत्येक घटक पक्ष स्वतःचा राजकीय विकास करण्यासाठी प्रयत्न करत राहणार आहे. ज्या प्रकारे काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनी आपल्या दुसर्या यात्रेला प्रारंभ केला आहे ते पाहता काँग्रेसचा प्रभाव वाढवणे हाच त्यामागील उद्देश आहे. साहजिकच इतर घटक पक्षांनीसुद्धा आगामी कालावधीमध्ये अशाच प्रकारच्या काही मोहिमा केला, तर आश्चर्य वाटायला नको. पण इंडिया आघाडीचे नेतृत्वच काँग्रेसकडे आले असल्याने ही आघाडी अबाधित ठेवण्यात आणि सर्व घटक पक्षांचे समान समाधान करण्याकडेच काँग्रेसला लक्ष द्यावे लागणार आहे. नितीशकुमार किंवा ममता बॅनर्जी किंवा अखिलेश यादव यांनी इंडिया आघाडीच्या कार्यपद्धतीबाबत यापूर्वीच काही प्रमाणात नाराजी व्यक्त केली आहे. दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल केवळ भाजपाला आव्हान देण्याच्या एक कलमी कार्यक्रमातूनच या आघाडीचा घटक झाले असले तरी त्यांनीही काँग्रेस आपला राजकीय शत्रू असल्याचे लपवून ठेवलेले नाही. महाराष्ट्रासारख्या राज्यांमध्ये उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा गट किंवा शरद पवार यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रवादी काँग्रेसचा गट केवळ स्वतःच्या अस्तित्वासाठी अपरिहार्यतेतून इंडिया आघाडीमध्ये राहिले आहेत. पण जागा वाटपामध्ये या दोन गटांची बार्गेनिंग पॉवर काँग्रेसच्या तुलनेमध्ये जास्त असणार आहे. काँग्रेसची सत्ता किंवा प्रभाव नसलेल्या बहुतेक सर्व राज्यांमध्ये अशीच परिस्थिती आहे. तेथील प्रादेशिक पक्षांची स्थिती अधिक चांगली असल्याने त्या पक्षांची बार्गेनिंग पॉवरही वाढली आहे. साहजिकच आगामी कालावधीमध्ये जर जागावाटपाच्या विषयाला पूर्णविराम द्यायचा असेल तर काँग्रेसला काही प्रमाणात पडती बाजू घ्यावीच लागणार आहे. आता सर्वच पक्षांनी मिळून या आघाडीचे नेतृत्व काँग्रेसकडे दिले असल्यामुळे ही आघाडी कोणत्याही प्रकारे तुटणार नाही याची काळजीसुद्धा काँग्रेसलाच घ्यावी लागणार आहे. काँग्रेसच्या ताठर भूमिकेमुळे जर ही आघाडी विघटित झाली तर त्याचे खापर काँग्रेसवरच फुटणार असल्याने त्याची दक्षताही काँग्रेसला आणि मल्लिकार्जुन खर्गे यांना घ्यावी लागणार आहे. साहजिकच एकाच वेळी काँग्रेस पक्षाचा प्रभाव देश पातळीवर वाढवण्याचे काम करत असतानाच इंडिया आघाडी एकसंध राहील अशा प्रकारे काम करण्याचे वेगळे आव्हान आगामी कालावधीमध्ये काँग्रेसला पेलावे लागणार आहे.

# महायुतीत सर्व सत्तेसाठी एकत्र, त्यांच्यात तत्वता नाही- ठाकरे



**मुंबई । वृत्तसंस्था**

लोकसभा सार्वत्रित निवडणूक अवघ्या काही महिन्यांवर आहे. अशात शिरूर लोकसभा मतदारसंघात शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने कार्यकर्त्यांची एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजित करण्यात आली होती. आंबेगाव तालुक्यातील मंचरमध्ये ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यावेळी शिवसेनेचे उपनेते आणि आमदार सचिन अहिर, मिलिंद नार्वेकर उपस्थित होते. यावेळी सचिन अहिर यांनी माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा त्यांनी आगामी लोकसभा निवडणुकीवर भाष्य केलं. शिरूर लोकसभा मतदारसंघ सध्या चर्चेत आहे. अशातच सचिन अहिर यांनी या लोकसभेच्या जागेविषयी आणि उमेदवारीबाबत भाष्य केलं आहे. शिरूर लोकसभा नाही तर विधानसभा लढवण्याची आमची तयारी आहे. १८ महिन्यापूर्वी लोकसभेसाठी आमच्याकडे चांगला उमेदवार होता. पण काहींनी त्यांना गुळ लावला आणि ते इतरांना गुळ लावत आहेत, असं म्हणत सचिन अहिर यांनी आढळराव पाटलांवर निशाणा साधला. आम्ही नवीन चेहरा तयार करु शकतो. पण महाविकास आघाडी जो उमेदवार देईल त्याचं काम करणार आहोत. महायुतीचा पराभव आणि महाविकास आघाडीचा विजय हा आमचा अजेंडा आहे, असंही अहिर म्हणाले. काहींनी पाठ फिरवली तर काहींनी स्टेजवर पाठ बदली केलीय. महायुतीत कोण कुणाच्या पाटावर बसलंय हे समजायला तयार नाही. आमदारच बोलत असुन आम्ही कुणाच्या पाटावर बसायचे अशी अवस्था महायुतीत आहे. हे सर्व सत्तेसाठी एकत्र आलेत त्यांच्यात तत्वता नाही. आमच्यातही काहींनी गद्दारी केली. तरी आम्ही महाविकास आघाडी टिकवली, असंही सचिन अहिर म्हणाले.

# तालुकास्तरीय लोकशाही दिन

**बीड । प्रतिनिधी**

शासन आदेशान्वये महिला व बाल विकास विभागाने, समस्या व पिडित महिलांना त्यांचे प्रश्न मांडण्यासाठी व्यासपीठ मिळण्यासाठी त्यांच्या हक्कांचे संरक्षण होऊन न्याय मिळावा या हेतूने जिल्हा तसेच तालुकास्तरावर महिलांसाठी विशेष लोकशाही दिन पाळण्यात येतो. पिडीत महिलांनी तालुकास्तरावर तहसील कार्यालयात अर्ज सादर करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी दिपा मुधोळ- मुंडे यांनी आज महिला लोकशाही दिन आयोजित प्रसंगी दिल्या. प्रत्येक तहसिल कार्यालयात महिन्याचे चौथ्या सोमवारी आणि जिल्हाधिकारी कार्यालयात दर महिन्याच्या तिस-या सोमवारी महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यासाठी दि. १५ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० ते १२.०० वाजेपर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात महिला लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात आले होते. या महिला लोकशाही दिनात तक्रार दाखल करु इच्छिणा-या महिलांनी आपली तक्रार दोन प्रतित महिला व बाल विकास अधिकारी कार्यालय बीड येथे दाखल करण्याचे आवाहन महिला व बालविकास अधिकारी यांनी केले होते.

# मराठ्यांविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारे निलंबित पोलिस निरीक्षक पोलिसांच्या ताब्यात

**नागपूर । वृत्तसंस्था**

मराठा समाजाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य करणारे निलंबित पोलिस निरीक्षक किरणकुमार बकाले गुन्हा दाखल झाल्यानंतर साडे सोळा महिन्यांनी सोमवार, १५ जानेवारी रोजी पोलिसांना शरण आले. त्यांना अटक करून दुपारी न्यायालयात हजर केले असता दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली. दरम्यान, बकाले यांना अटक करण्यात आल्याचे व त्यांना न्यायालयात हजर केले जाणार असल्याचे समजताच मराठा समाज बांधव तसेच विविध संघटनांचे पदाधिकारी न्यायालय परिसरात जमा झाले होते. त्यामुळे मोठा पोलिस बंदोबस्तदेखल तैनात करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे शाखेत निरीक्षक पदावर असताना बकाले यांनी त्यांच्याच कार्यालयातील सहायक फौजदाराशी मोबाईलवर बोलताना मराठा समाजाविषयी आक्षेपार्ह वक्तव्य केले होते. त्याची ऑडीओ क्लीप समाजमाध्यमात व्हायरल झाल्यानंतर मोठा रोष व्यक्त करण्यात आला. यात जिल्हापेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात मोठे आंदोलनदेखील झाले. गुन्हा दाखल झाल्यापासून ते पसार होते. अखेर बकाले सोमवार, १५ जानेवारी रोजी सकाळी साडे दहा वाजता तपास अधिकारी उपविभागीय पोलिस अधिकारी संदीप गावित यांच्याकडे हजर झाले. त्यांना ११ वाजता अटक करण्यात आले. त्यानंतर पोलिस कोठडीच्या मागणीसाठी त्यांना न्यायालयात हजर केले असता न्या. केळकर यांनी दोन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. सरकारपक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील प्रिया मेढे यांनी तर बकालेतर्फे ड. सूरज जहांगिर यांनी काम पाहिले. तर हरकतदारांतर्फे ड. गोपाळ जळमकर यांनी युक्तीवाद केला.

# राणेंची मंत्रीमंडळातून हकालपट्टी करा

**मुंबई । वृत्तसंस्था**

हिंदू धर्मासाठी शंकराचार्यांचे योगदान काय? असा सवाल भारतीय जनता पक्षाचे नेते व केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केला होता. यावरून विरोधक नारायण राणे यांच्यावर टीका करत आहे. तसेच नारायण राणे यांची मंत्रिमंडळातून हकालपट्टी करा, अशी मागणीही केली जात आहे. यासंदर्भात आता शंकराचार्यांनी प्रतिक्रिया दिली असून, नारायण राणे यांच्या विधानाचा खरपूस शब्दांत समाचार घेतला आहे. ज्योतिष पीठाचे जगद्गुरु शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी नारायण राणे यांना उत्तर दिले. हजारो वर्षापासून देश गुलामित होता. पण तरीही आज सनातन धर्म टिकून आहे. नारायण राणे आपले माता-पिता, आजी-आजोबांसोबत सनातन धर्माच पालन करत आहेत, त्यामागे कुठली १०० वर्षांची संघटना किंवा ४५ वर्षांचा पक्ष नाहीय. हे अडीच हजार वर्षांपासूनच्या शंकराचार्यांच्या परंपरेमुळे शक्य झाले आहे, असे शंकराचार्य यांनी म्हटले आहे. आम्ही कुठे शाप दिलाय. आम्ही आतापर्यंत शाप शब्द उच्चारलेला नाही. आम्ही आशिर्वाद देतो. त्यांच्या पक्षालाही सगळे आशिर्वाद देत आहेत. 'सर्वे भवंतु सुखिनः सर्वे संतु निरामया' हा आमचा रोजचा पाठ आहे. आम्ही सगळ्यांना आशिर्वाद देतो. त्यात नारायण राणे आणि त्यांच्यासोबतचे लोक आहेत. जी धर्मशास्त्राची बाजू आहे, ती मांडणे आमची जबाबदारी आहे. आम्ही फक्त आमच्या जबाबदारीच पालन करत आहोत, असे शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद सरस्वती महाराज यांनी म्हटले आहे. दरम्यान, आम्ही सगळ्यांबद्दल बोलू शकत नाही. एक शंकराचार्य म्हणून सनातन धर्माच्या कुठल्याही आयोजनात शास्त्रीय पक्ष पाहणे, त्याची समीक्षा करणे आणि मार्गदर्शन ही जबाबदारी आहे. आम्ही त्याच जबाबदारीच पालन करत आहोत, असेही ते म्हणाले. अन्य शंकराचार्यांनी प्राणप्रतिष्ठा सोहळ्याच स्वागत आणि समर्थन केले. यावर बोलताना शंकराचार्य स्वामी अविमुक्तेश्वरानंद म्हणाले की, कोण काय करतय हे तुम्ही त्यांना विचारा. आम्ही त्यांचे प्रवक्ते नाहीत, त्यांच्या बाजूचे विश्लेषण करु शकत नाही.

# नव्या सालात जबाबदार पर्यटनावर भर; पर्यावरण संतुलन,रोजगार,शाश्वत विकासाचे धोरण

**मुंबई । वृत्तसंस्था**

राज्यातील पर्यटनाला अधिकाधिक व्यापक स्वरुपात विकसित करण्यासाठी शासनाच्या पर्यटन विभागाने नव्या वर्षात जबाबदार पर्यटनाचे धोरणावर लक्ष केंद्रित करण्याचे ठरविले आहे. या माध्यमातून पर्यटकांनी केवळ पर्यटन न करता त्यासोबतच पर्यावरण संतुलन, रोजगार संधी, स्थानिक कला व कलाकारांना प्रोत्साहन आणि स्थानिक अर्थकारणाचे बळकटीकरण करावे या उद्देशाने काम करण्यात येणार आहे. जबाबदार पर्यटनाची अंमलबजावणी करत असताना पर्यटन विभागाने राज्यातील एमटीडीसीच्या सर्व रिसोर्टमध्ये कृत्रिम खाद्यरंगांच्या वापराला प्रतिबंध केला आहे. रिसोर्टमधील जेवणात अजिनोमोटो या आरोग्यासाठी हानिकारक असलेल्या घटकाचा वापरही बंद करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे, राज्यभरात पर्यटन विभागाच्या कार्यालयात वा रिसोर्टमध्ये सिंगल युज प्लास्टिक प्रतिबंधित असून शिवाय, खाद्यपदार्थ पॅकिंग करण्यासाठीही केवळ बायोडिग्रेडेबल पॅकेजेसचा वापर करण्यात येतो. तसेच, राज्यभरातील पर्यटन विभागाच्या रिसोर्टमध्ये कचऱ्याचे वर्गीकरण, जल संधारण, जैवविविधतेचे संवर्ध आणि वृक्षारोपण केले जाते. याखेरीस, विशेष म्हणजे दिव्यांग वा मनोरुग्णांसाठी विशेष पर्यटन टूरचे आयोजनही केले जाते, अशी माहिती पर्यटन विकास महामंडळाचे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक चंद्रशेखर जयस्वाल यांनी दिली आहे. जबाबदार पर्यटनाच्या माध्यमातून स्थानिक भूमीपुत्रांना रोजगार मिळावा या हेतूने पर्यटन विभागाकडून आदरातिथ्याचे प्रशिक्षण देण्यात येते. तसेच, स्थानिक कला- खाद्य संस्कृतीलाही प्रोत्साहन देऊन त्यांच्या उत्पादनांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न व्यापक स्वरुपात करण्यात येणार आहे. ही संकल्पना पर्यावरणीय शाश्वतता, जैवविविधतेचे संरक्षण, आर्थिक शाश्वतता, सामाजिक-सांस्कृतिक शाश्वततेला चालना, शाश्वत पर्यटन प्रमाणीकरणासाठी उपयुक्त ठरेल असा विश्वासही पर्यटन विभागाच्या अधिकाऱ्यांनी व्यक्त केला आहे. पर्यटन आणि पर्यावरण यांचा विशेष संबंध आहे. त्यांचा एकमेकांशी संवाद ही दुहेरी प्रक्रिया आहे. एकीकडे पर्यावरण संसाधने पर्यटनाच्या मूलभूत घटकांपैकी एक आहेत. नैसर्गिक आणि मानवनिर्मित पर्यटन स्थळे एक प्रकारे पर्यटन संधी तयार करतात, ज्याचा पर्यटक आनंद घेतात, तिथे राहतात आणि आराम करतात. दुसरीकडे, पर्यटक, आयोजक समुदाय आणि स्थानिक वातावरण यांच्यातील जवळचे आणि थेट संबंध एक संवेदनशील परिस्थिती निर्माण करतात. ज्यायोगे पर्यटन शाश्वत विकासासाठी खूप सकारात्मक देखील असू शकते. या अनुषंगाने पर्यटन क्षेत्रातील विविध भागधारकांमधील लवचिकता, टिकाऊपणा आणि परस्परसंबंध यावर लक्ष केंद्रित करण्यात येत आहे. यामुळे पर्यावरणीय, सामाजिक-सांस्कृतिक आणि आर्थिक शाश्वतता यासह शाश्वत पर्यटनाच्या तत्त्वांचा अवलंब करण्यास निश्चितच प्रोत्साहन मिळेल. - श्रद्धा जोशी , व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ

पान १ वरून....

## जागेच्या वादातून

आहेत. उद्धव कुंभार हा रविवारी दुपारी मोंढा भागात सुगडे विकण्यासाठी बसला. तेथे बसण्यास फळ विक्रेत्यांनी विरोध केला. त्यामुळे उद्धव हा भांड्याचे व्यापारी शाम वानरे यांच्या दुकानाजवळ येवून बसला. दरम्यान, रविवारी रात्री ८.३० वाजता फळ विक्रेत्यांच्या एका गटाने कुंभार यांना मारहाण केली. यावेळी वानरे यांच्या भांड्याच्या दुकानातही गोंधळ घातला. त्यामुळे वातावरण तणावाचे झाले. याप्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात दोन्ही गटाच्या ३० लोकांविरुद्ध सोमवारी पहाटे गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे. धिंगाणा घालणाऱ्यांच्या शोधासाठी पोलिसांची तीन पथके नियुक्त करण्यात आल्याची माहिती परळी शहर चे सहाय्यक पोलीस निरीक्षक गोरखनाथ दहिफळे यांनी दिली. मकर संक्रांतीच्या पार्श्वभूमीवर रविवारी बाजारात महिलांची गर्दी असतानाच अचानक काही लोकांनी दुकानात घुसून एकास जबर मारहाण केली. यावेळी सोडवासोडवी करण्यास गेलेल्यासही या जबर मारहाण केली. याबाबत काहींनी पोलीसात तक्रार करण्यास गेले असता त्यांची तक्रार घेतली नाही. यामुळे बराच गोंधळ झाला. दरम्यान याचवेळी एक गट हल्ला करण्याचा प्रयत्न करत असताना दुसऱ्या गटाने प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. यावेळी दोन गटांकडून एकमेकांवर तुफान दगडफेक झाली. याचवेळी नेहरू चौक भागातील वाहनांचीही मोडतोड करण्यात आली. यावेळी पोलिसांनी हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. मात्र मनुष्यबळ कमी असल्याने नहाशक्ती! त्यांचे प्रयत्न कमी पडू लागले. पोलिसांनी अथक प्रयत्न करून प्रकरणावर नियंत्रण ठेवले. रविवारी रात्री यांनी उद्धव कुंभार यांनी परळी शहर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली त्यावरून १५ जणा वीरोधात तर पोलिसांच्या फिर्यादी वरून १५ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. आता शहरात शांतता आहे.

## मराठा आरक्षणासाठी

येथून सुरू होईल. नंतर महात्मा बसवेश्वर चौक, राजमाता जिजाऊ चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक, देशपांडे स्टॅन्ड, राजमाता अहिल्यादेवी होळकर चौक मार्गे तुळजापूर शहरात दाखल होईल. श्री तुळजाभवानी देवीचे दर्शन घेऊन मराठा समाजाला आरक्षण मिळावे, मुंबई येथील मनोज जरांगे पाटील यांच्यासह सर्व समाजबांधवाचे आंदोलन यशस्वी व्हावे, यासाठी साकडे घातले जाणार आहे, अशी माहिती सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली.

## अधिवेशन बोलवा

बोलताना मनोज जरांगे यांनी सांगितले की, सापडलेल्या ५४ लाख नोंदींवर तातडीने प्रमाणपत्र वितरीत करण्याचा मुद्दा चर्चेत आला. ग्रामपंचायतींमध्ये त्याची यादी लावणे आणि सगेसोयरे शब्दाविषयीही आमची सरकारबरोबर चर्चा झाली. मागेल त्याला मराठ्याला आरक्षण यावरही चर्चा झाली. तसे त्यांना लिहूनही दिले आहे. सापडलेल्या नोंदी अपलोड करून ठेवायला हवे. गावनमुन्याच्या नोंदीही घेण्याबाबत चर्चा झाली. हे सगळे २० तारखेच्या आत करा असे आम्ही सांगितले आहे, अशी माहिती मनोज जरांगे यांनी दिली. सगेसोयरे शब्दावर शासननिर्णय किंवा कायदा पारित करण्यासंदर्भातही सांगितले आहे. आता बघू काय करतात. पण काहीही होवो, मुंबईला २० जानेवारीला जायचे म्हणजे जायचे. आशेवर कुणीही राहायचे नाही, असे मनोज जरांगे यांनी स्पष्ट केले. आम्ही स्पष्टच सांगितले. ज्याची नोंद मिळाली, त्याच्या रक्ताच्या सगेसोयऱ्यांना तात्काळ कुणबी प्रमाणपत्र द्यायचे. तरच तुमचे-आमचे जमेल. नाहीतर नाही जमणार. नोंद मिळाली त्याच्या रक्ताच्या सगेसोयऱ्यांना लाभ मिळायला हवा. त्यासाठी शासननिर्णय किंवा कायदा पारित केल्याशिवाय ते होणार नाही, असे मनोज जरांगे म्हणाले. दरम्यान, दररोज ९० ते १०० किमीचा प्रवास करायचा आहे. ज्यांना शक्य आहे त्यांनी चालायचे, इतरांनी गाडीत बसून प्रवास करायचा आहे. ज्या ठिकाणी मुक्काम आहे त्या ठिकाणी त्या मुक्काम स्थळाच्या शेजारी असलेल्या गावकऱ्यांकडून जेवणाची सोय होणार आहे. पहिला मुक्काम बीड जिल्ह्यातील शिरुरमध्ये असणार आहे. प्रत्येक मुक्काम डोंगरात असणार आहे. गावात कोणताही मुक्काम असणर नाही. मराठा समाज मुंबईला जाणारच, मराठ्यांनी मुंबईला जाण्याची तयारी ठेवा. सर्वांनी मुंबईकडे चला, असे आवाहन मनोज जरांगे यांनी केले.

## रश्मी ठाकरे सक्रीय

पक्षाला कितपत पोहचली आहे. त्यात नव्या दमाने येणाऱ्या महिला कार्यकर्त्यांना जबाबदारी दिली जाणार आहे. अंगणवाडी सेविका, महिला बचत गट यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार आहे असं त्यांनी सांगितले. तसेच इंडिया आघाडीच्या घटक पक्षांच्या महिला पदाधिकाऱ्यांसोबतही चर्चा साधली जाणार आहे. जेणेकरून महिला पदाधिकाऱ्यांचे मनोमिलन करणार आहेत. महिला आघाडीच्या याआधीच्या कार्यक्रमात रश्मी ठाकरेंचे मार्गदर्शन होते. परंतु रश्मी ठाकरे यांच्या नेतृत्वात आणि मार्गदर्शनात स्त्री संवाद यात्रा राज्यभरात आणि मुंबईतल्या शाखाशाखांमध्ये घेणार आहेत. रश्मी ठाकरे या सर्व मोहिमेवर लक्ष ठेवून असणार आहेत हे आर्वजून संजना घाडी यांनी नमूद केले. त्यामुळे रश्मी ठाकरे आगामी काळात सक्रीय राजकारणात उतरणार का अशी चर्चा आता सुरू झाली आहे. दरम्यान, १६ जानेवारी ते २० जानेवारी हा विदर्भात दौरा होईल. गडचिरोली ते विदर्भातील सर्व जिल्ह्यात आम्ही महिला पदाधिकाऱ्यांशी चर्चा करणार आहोत त्यानंतर टप्प्याटप्प्याने हा दौरा राज्यभरात होईल. शिवसेनेच्या उपनेत्या विशाखा राऊत, ज्योती ठाकरे, संजना घाडी, किशोरी पेडणेकर, शीतल देवरुखकर अशा वेगवेगळ्या गटाने हा दौरा होईल अशी माहिती रंजना नेवाळकर यांनी दिली.

## तरुणावर प्राणघातक

क्रिकेट कशाला खेळतो असे म्हणत शिवीगाळ केली होती. तर १३ जानेवारी रोजी दुपारी अभिषेक हा झोपला असता अभिषेक चंदनशिवचा केवड येथील मित्र रोहन सुदामराव गवळी याने दोन - तीन वेळा फोन तु बाहेर ये, तु अभिषेकला नडतो, तुला आज फोडतो, तुझा मर्डरच करतो. अशी धमकी देत घराबाहेर बोलावले. त्याने घराबाहेर जाऊन पाहिले असता आशिष मस्तुद, अभिषेक चंदनशिव, प्रतिक शिंदे, अविष्कार उघडे, अभिषेक अनंत चंदनशिव, रोहन गवळी, अमर तुपारे हे रस्त्यावर थांबले होते. त्यांच्या हातात धारदार कत्ती, चाकू हे पाहून तो घाबरून पळू लागला. याचवेळी आशिष मस्तुद याने जिवे ठार मारण्याचे उद्देशाने अभिषेक दातार याच्या डोक्यात कत्तीचा वार केला. तुला आज जिवंत सोडणार नाहीत असे म्हणत अभिषेक बारीकराव चंदनशिव याने चाकुसारख्या धारदार हत्याराने डोक्यावर वार करीत हात आडवा केल्याने अंगठ्याला व करंगळीजवळच्या बोटाला जखम होऊन रक्तस्त्राव होऊ लागला. रोहन गवळी याने दुचाकीला अडकविलेला लोखंडी रॉड काढून त्याच्या छातीवर मारल्याने तो खाली पडला. त्यानंतर सर्वांनी त्याच्या छातीवर, पोटावर दगड मारले. त्यानंतर त्याचा मोठ्याने ओरडण्याचा आवाज ऐकून त्याची आई, मित्र व गावातील भांडण सोडविले. तोपर्यंत तो चक्कर येऊन बेशुध्द झाला. त्याच्यावर केजच्या उपजिल्हा रुग्णालयात प्रथमोचार करून अंबाजोगाईच्या स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयात पाठविले आले. १४ जानेवारी रोजी शुद्धीवर आल्यावर अभिषेक दातार याने दिलेल्या जबाबावरून आशिष मस्तुद, अभिषेक चंदनशिव, प्रतिक शिंदे, अविष्कार उघडे, अभिषेक अनंत चंदनशिव, रोहन गवळी, अमर तुपारे या सात जणांविरुद्ध केज पोलिसात कलम ३०७ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक बाळासाहेब पवार यांच्या मार्गदर्शनात फौजदार वैभव सारंग हे पुढील तपास करीत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed, Beed -431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq-Beed Dist-Beed pin -431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail-dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि.बीड, -४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता.जि.बीड -४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper : https://marathwadapatra.com,Eportal-https://marathwadapatra.com

# मंत्री संदीपान भुमरेंना कमीशन द्यावे लागते; जनतेचा आरोप

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

चक्क एका मंत्र्यासमोरच दुसरा मंत्री टक्केवारी घेत असल्याचा आरोप करण्यात आल्याचा प्रकार छत्रपती संभाजीनगरमध्ये पाहायला मिळाला. जिल्ह्यात मजूर सहकारी सोसायटीच्या निवडणुका सुरू आहेत. याच निवडणुकीच्या प्रचारादरम्यान हा आरोप करण्यात आला आहे. प्रचार सभा सुरु असतांना या सभेतच पालकमंत्री संदिपान भुमरे यांना १५ टक्के द्यावे लागतात असा गंभीर आरोप सोसायटीच्या चेअरमनने केला आहे. त्रपती संभाजीनगर जिल्हा मजूर सहकारी संस्थेच्या निवडणुक सुरू आहे. याच निवडणुकीत सत्ताधारी पक्षाचे मजूर सहकारी विकास पॅनलच्या उमेदवारांच्या प्रचारासाठी सभा घेतल्या जात आहेत. या निवडणुकीच्या अनुषंगाने मजूर सहकारी विकास पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ खुलताबाद येथील श्री. भद्रा मारोती संस्थान येथे नारळ फोडून तसेच येथील जर जरी बक्ष दर्गा येथे चादर चढवून करण्यात आला. यानंतर येथील म्हैसमाळ रोडवरील ए वन लॉन्स येथे प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. दरम्यान, यावेळी बोलतांना सोसायटीच्या एका चेअरमनने मंत्री संदिपान भुमरे यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. यावेळी बोलतांना चेअरमन म्हणाले की,विकास कामं फक्त मोठमोठ्या लोकांना मिळते. आमच्या सारख्या गरिबांना काहीच मिळत नाही. आमच्या हातात एकही काम आले नाही. आम्ही सर्व चेअरमन फक्त नालावाच चेअरमन आहोत. आमची परिस्थिती खूप गंभीर आहे. अब्दुल सत्तार येथे असल्याने त्यांना सांगणे गरजेचे आहे. आम्ही त्यांना सांगणार नाही तर कोणाला सांगणार आहोत. आमच्या तालुक्याचे जेवढे गोरगरीब चेअरमन आहेत, ते कुठे गेले तर त्यांना इकडून तिकडे पळवले जाते. आमच्या तालुक्याचे आमदार तथा पालकमंत्री संदिपान भुमरे यांच्याकडे गेलो तर त्यांना १५ टक्के द्यावे लागते.

# वनक्षेत्र कमी असल्यानेच बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळाचे संकट

**बीड । प्रतिनिधी**

वनक्षेत्र आणि हरित क्षेत्र कमी असल्याने बीड जिल्ह्यात वारंवार दुष्काळजन्य स्थिती निर्माण होते. दुष्काळमुक्तीसाठी जल पुनर्भरणाबरोबरच नद्या जिवंत ठेवण्याची गरज आहे. सरकार फक्त नियंत्रणाचे काम करू शकते, पाऊसप्रमाण वाढविण्यासाठी वनक्षेत्र वाढवून हरितभूमी करण्यासाठी सामाजिक संस्थांनी पुढे येण्याचे आवाहन वॉटरमॅन राजेंद्रसिंह राणा यांनी केले. सोमवारी अंबाजोगाई येथे कार्यक्रमानिमित्त ते आले होते. दुपारी बीड येथे त्यांनी जिल्हाधिकारी दीपा मुधोळ यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. राजेंद्रसिंह राणा म्हणाले, चला जाणूया नदीला



उपक्रमांतर्गत ११८ नद्यांवर काम करण्यात आले. त्याचा अहवाल शासनाकडे सुपूर्द करण्यात येणार आहे. यात महाराष्ट्रातील पाच नद्यांचा अभ्यास करून कृती आराखडा तयार केला आहे. दुष्काळ पडण्याची कारणे शोधून बदलत्या पाऊस पद्धतीप्रमाणे पीक पद्धती जोडण्याचे काम करावे लागणार आहे. हिरवाई नसल्याने दुष्काळ पडतो. त्यामुळे कार्बनचे रूपांतर मातीत होत नाही. हिरवाई निर्माण करून जमिनीत पावसाचे जिरलेल्या पाण्याचे होणारे बाष्पीभवन रोखण्यासाठी प्रयत्न करावे लागणार असल्याचे ते म्हणाले. पूर्वी सेंद्रिय शेती पद्धतीमुळे अशी विदारकता नव्हती. परंतु, रासायनिक शेती वाढल्याने ही विदारकता निर्माण होत असल्याचे राणा म्हणाले. यावेळी चला जाणूया नदीला उपक्रमाचे राज्य सदस्य अनिकेत लोहिया, नरेंद्र चुग, रमाकांत कुलकर्णी, जिल्हा सदस्य एच. पी. देशमुख, आदी उपस्थित होते. जलसाठा वाढविण्यासाठी तसेच पावसाचे वाहून जाणारे पाणी वाचविण्यासाठी ओढे, नाले, नदी, तलाव, आदी जलस्रोतांवरील अतिक्रमणे काढणे, त्यांची ओळख, मालकी व क्षेत्र निश्चित करणे, नादुरुस्त सिमेंट नाला, बंधारे, केटीवेअर दुरुस्त करून पुन्हा पूर्वक्षमतेने स्थापित करणे, सांडपाणी व्यवस्थापन तसेच वनस्पतीचा उपयोग करणे, आदी बाबींचा नदी सुधार कृती आराखड्यात समावेश आहे.

# वंचितने काँग्रेसचे ९ खासदार पाडले हे सत्य; काँग्रेसची टिका

**मुंबई । वृत्तसंस्था**

गेल्या वेळच्या लोकसभा निवडणुकीवेळी प्रकाश आंबेडकरांमुळे काँग्रेसचे नऊ खासदार पडले, त्यांच्या डोक्यात काय सुरू आहे हे पाहावं लागेल असं महत्वपूर्ण वक्तव्य काँग्रेस नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केलं आहे. त्यांनी व्यवहारिक मागणी करून आमच्यासोबत आलं पाहिजे, ते जर आले नाहीत तर गेल्या वेळी केला तोच प्रयत्न आहे का हे तपासावं लागेल असंही ते म्हणाले. माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, प्रकाश आंबेडकर यांनी व्यवहारिक मागणी करून बाबासाहेबांचे संविधान वाचवलं पाहिजे. जास्तीत जास्त लोक उभी करून काँग्रेसचे मतांमध्ये विभाजन करणे आणि उमेदवारांना पाडणं ही मोदींची स्टॅटीजी आहे. त्यामुळे राजू शेट्टी असतील किंवा प्रकाश आंबेडकर, यांनी उमेदवार उभे केले तर फायदा आणि तोटा कोणाला होणार हे स्पष्ट आहे. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, प्रकाश आंबेडकर यांच्या डोक्यामध्ये काय सुरू आहे हे मला आत जाऊन पाहता येणार नाही. मात्र मागच्या निवडणुकीमध्ये त्यांच्यामुळे आमचे नऊ खासदार पडले हे खरं आहे. जर ते आमच्या सोबत आले नाही तर गेल्या वेळी केलं तोच प्रयत्न आहे का अशी शंका निर्माण होईल. मात्र मला वाटतं ते आमच्या सोबत येतील. प्रकाश आंबेडकर जर आमच्या सोबत आले तर देशाचे नेते होतील, कारण देशात आंबेडकर हे नाव दुसऱ्या कोणाकडेच नाही. प्रकाश आंबेडकर सर्वांना ओळखतात, त्यामुळे त्यांनी जाऊन म्हटले की मला यायचं आहे तर त्यांना कोण नाही म्हणणार नाही. त्यांनी मलिकार्जुन खरगे यांना पत्र लिहिले आहे. मात्र ते एका प्रवक्त्याच्या नावाने लिहिलं आहे. त्यामुळे तो खरगेंचा अपमान आहे असं आम्हाला वाटतं. प्रकाश आंबेडकर ज्या जागांची घोषणा करतात, त्या जागा निवडून येण्याची शक्यता किती आहे हे पाहावं लागेल. त्याचा विचार करुन त्यांनी व्यवहारिक बोललं पाहिजे. मोदींनी जर संविधान बदललं तर त्याला जबाबदार कोण असणार आहे? राजू शेट्टी, प्रकाश आंबेडकर, संभाजीराजे, कम्युनिस्ट पक्ष या सगळ्यांशी आपण बोललं पाहिजे हे मी दिल्लीतील आमच्या नेत्यांना सांगितलं आहे. आपल्यापेक्षा जर त्यांच्याकडे चांगला उमेदवार असेल तर तसा निर्णय घेतला पाहिजे असंही सांगितलं आहे.

# शेतकऱ्यांच्या रक्ताने सरकारचे हात बरबटले; राजू शेट्टी यांचा घणाघात

**धाराशिव । वृत्तसंस्था**

एकीकडे शेतीमालाचे भाव पाडून, निर्यातबंदी करून उद्योगपतींना आयातीस मुभा दिली जाते. आणि दुसरीकडे उद्योगपतींचे भरमसाठ कर्ज माफ करून शेतकऱ्यांना मात्र वाऱ्यावर सोडले जाते. सरकारच्या अशा शेतकरी विरोधी धोरणामुळेच बळीराजा अडचणीत आला आहे. आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलत आहे. मागील अडीच वर्षांच्या तुलनेत वर्षभरात अडीच टक्क्यांनी शेतकरी आत्महत्या वाढल्या असून शेतकऱ्यांच्या रक्ताने सरकारचे हात बरबटले आहेत, अशा शब्दात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष माजी खासदार राजू शेट्टी यांनी घणाघात केला. शेतकऱ्यांच्या कर्जमुक्तीसह विविध मागण्यांसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने सोमवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर ट्रॅक्टर मोर्चा काढण्यात आला होता. यावेळी ते बोलत होते. माजी खासदार शेट्टी म्हणाले, आज सोयाबीनला भाव मिळत नाही. दुधाची दरवाढ तीन महिन्यांपर्यंत टिकते. त्यानंतर पुन्हा जैसे थे परिस्थिती असते. सध्या सरकारने कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातल्यामुळे देशातील ३० लाख लोकांचा रोजगार बुडाला आहे. पाम तेलाची आयात करण्यास केंद्र सरकारने परवानगी दिली. आणि सोयाबीन, सूर्यफूल, शेंगदाणा अशा मालाला मोठा फटका बसला. सरकारच्या अशा धोरणामुळे शेतकरी आणखी कंगाल होत आहे. तर, उद्योगपती श्रीमंत, स्वातंत्र्याच्या ७५ वर्षांत जेवढी कर्जमाफी ६५ टक्के शेतकऱ्यांना दिली, त्या तुलनेत १ टक्का असलेल्या उद्योगपतींना मात्र, १० पट कर्ज माफ करण्यात आले. त्यामुळे आता या सरकारला जाब विचारण्याची वेळ आली असून शेतकऱ्यांचा सातबारा कोरा झाल्याखेरीज आपण स्वस्थ बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## स्वाभिमानी' लोकसभा स्वतंत्र लढविणार -राजू शेट्टी

सातारा : सत्ताधारी आणि विरोधी या दोघांचेही हात बरबटलेले आहेत. त्यामुळे स्वाभिमानी पक्ष मतदारांसमोर स्वतंत्रपणे जाणार आहे. मतदारांना जे करायचे आहे, ते करतील, असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते तथा माजी खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. स्वाभिमानी पक्षाने लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराचा नारळ यानिमित्ताने फोडला. शेट्टी म्हणाले, सगळे जण स्वार्थासाठी पक्ष सोडून या पक्षातून त्या पक्षात जात आहेत. निकाल देतानाही चुकीच्या पद्धतीने दिला जात आहे. हेही पात्र आणि तेही पात्र, मग मतदार अपात्र आहेत का, असा प्रश्न पडतो. व्यवस्था पूर्णपणे बरबटलेली आहे. त्याला स्वच्छ करण्यासाठी मैदानात उतरणार आहे. सरकारचे धोरण महागाई यावर आवाज उठविण्याची कुणाची ताकद नाही. मीच त्यावर आवाज उठवू शकतो. निवडणुकीकडे आता गांभीर्याने बघण्याची वेळ आली आहे. मी सभागृहात नसल्याची जाणीव आता होत आहे. केंद्र सरकारला प्रश्न विचारणाऱ्यांचे रेकॉर्ड चांगले असले पाहिजे. जे ईडीला घाबरत नाहीत, तेच प्रश्न विचारू शकतात, ती धमक माझ्यात आहे.

# दुष्काळग्रस्त भागात महसूल विभागाची करवसुली थांबवा -विजय वडेट्टीवार

**नागपूर । वृत्तसंस्था**

राज्यातील दुष्काळग्रस्त गावांमध्ये महसूल विभागाकडून करवसुली सुरू असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महसूलमंत्र्यांच्या जिल्ह्यात हा प्रकार घडत असल्याने शेतकऱ्यांनी न्याय मागायचा कोणाकडे, असा प्रश्न शेतकरी विचारत आहेत. सरकार एकीकडे दावोसवर ३४ कोटींची उधळण करत आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांकडून वसुली सुरु आहे. यामुळे हे सरकार शेतकरी विरोधी असल्याचे वारंवार सिद्ध होत आहे. अशा शब्दात विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारचे वाभाडे काढले आहेत. त्याचबरोबर दुष्काळग्रस्त भागात महसूल विभागाने करवसुली तात्काळ थांबवावी, अशी मागणी वडेट्टीवार यांनी सरकारकडे केली आहे. वडेट्टीवार म्हणाले की, लेखी आदेश वेगळे आणि तोंडी आदेश वेगळे असा खेळ या सरकारने मांडला आहे. सरकार शेतकऱ्यांची दिशाभूल करत आहे. दुष्काळग्रस्त भागात सरकारी वसुली, वीजबिल वसुली, कर्जवसुलीला बंदी आहे. तरीही दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांकडून वसुली सुरु आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यंत तुटपुंज्या सवलती आहेत. तरीही महसूल वसुली, कर्जवसुलीचा तगादा लावला जात आहे. अशा संवेदना गमावलेल्या सरकारला शेतकऱ्यांनी जागा दाखवावी. नगर जिल्ह्यातील कोपरगाव तालुक्यात गाव पातळीवर तलाठ्याकडून करांची वसुली केली जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. याशिवाय अन्य दुष्काळी उपाययोजनांकडेही दुर्लक्ष केले जात असल्याचा शेतकऱ्यांचा आरोप आहे. महसूलमंत्र्याच्या जिल्ह्यात महसूल कराची वसुली होत असल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. सरकारने शेतकऱ्यांना नाहक त्रास देऊ नये. शेतकऱ्यांकडून वसुली करू नये. दावोसवर उधळपट्टी करताना शेतकऱ्यांचा विचार करावा, अशा शब्दात श्री. वडेट्टीवार यांनी सरकारचे कान उपटले आहेत.

## देशाचे संविधान कोणीही बदलू शकत नाही -रामदास आठवले

**नागपूर । वृत्तसंस्था**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिले. देशाचे संविधान कोणिही बदलू शकत नाही. मात्र संविधान बदलत असल्याबाबत काँग्रेस व विरोधी पक्ष हे जनतेची व समाजाची दिशाभूल करीत असल्याचे टिकास्त्र केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी १५ जानेवारी रोजी वाशिम येथील भूमि हक्क परिषदेत सोडले.



स्थानिक वाटाणे लॉन येथे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) च्यावतीने आयोजित आयोजित भूमि हक्क परिषदेचे उद्घाटक म्हणून ना. रामदास आठवले होते. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी रिपाईचे (आ.) जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे होते. पुढे बोलताना ना. आठवले म्हणाले, देशाचे संविधान अबाधित आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे देशातील सर्वधर्मीय समाजबांधवांना सोबत घेऊन चालत आहेत, सर्वांना न्याय देत आहेत. पंतप्रधान मोदी यांनी खऱ्या अर्थाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान केला आहे. यावेळी रिपाईचे जिल्हाध्यक्ष तेजराव वानखेडे यांनीदेखील मनोगत व्यक्त केले. कडूबाई खरात यांनी भीमगितांचा बहारदार कार्यक्रम सादर केला. परिषदेला मोठ्या संख्येने रिपाईचे कार्यकर्ते, पदाधिकारी, जिल्हाभरातून आलेले नागरीक उपस्थित होते. भूमि हक्क परिषदेच्या मध्यमातुन आपन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजीत पवार यांची भेट घेवुन कष्टकरी, भूमिहीन दलित समाजातील लोकांना जमिन देण्याची मागणी आपण रेटणार असल्याचे आश्वासन ना. आठवले यांनी दिले. प्रलंबित वाशिम-बडनेरा रेल्वे मार्गाबाबत निधिसाठी पाठपुरावा करणार असल्याचे सांगतानाच, वाशिम-जालना या लोहमार्गासाठी सुद्धा केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची शिष्टमंडळज्ञसोबत लवकरच भेट घेऊ, असेही आठवले यांनी सांगितले.

# शिंदे-भाजप सरकारविरोदात शेतकरी, शेतमजुरासह निराधारांचा महाआक्रोश मोर्चा

**छत्रपती संभाजीनगर । वृत्तसंस्था**

मराठवाड्यातील शेतकरी, शेतमजूर आणि निराधारांच्या विविध मागण्यांसाठी सोमवारी औसा तहसील कार्यालयावर महाआक्रोश मोर्चा काढण्यात आला. यावेळी सरकारच्या धोरणामुळे शेतकऱ्यांचे वाटोळे केले आहे. पश्चिम महाराष्ट्राच्या तुलनेत ऊसाला भाव का मिळत नाही, असा प्रश्न शेतकऱ्यांनी यांनी उपस्थित केला. जोपर्यंत सोयाबीनला प्रतिक्विंटल ९ हजार भाव, १०० टक्के पिकविमा, निराधारांना ३ हजार मानधन मिळत नाही, तोपर्यंत शांत बसणार नसल्याचा इशारा त्यांनी दिला. औसा तालुक्यात १५ दिवस १०० गावातून १५० कि.मी. पायीदिंडी काढून शेतकरी, शेतमजूर आणि निराधारांच्या मागण्याची जनजागृती करण्यात आली. किल्ला मैदान ते औसा तहसील कार्यालयापर्यंत महाआक्रोश मोर्चा काढून सरकारचे लक्ष वेधले. यावेळी कांदा निर्यात बंदी उठवा, नियमित कर्ज फेडणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार प्रोत्साहन अनुदान द्याओ, चालू बाकी करणाऱ्यांसाठी व्याजासह कर्जाची संपूर्ण रक्कम भरण्याची अट रद्द करण्याची मागणी करण्यात आली. यावेळी शेतकरी विरोधी धोरण राबविणाऱ्या सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी शेतकरी नेते , राजेंद्र मोरे, अरुण कुलकर्णी, राजू कसबे, शामभाऊ जाधव आदींसह शेतकरी, शेतमजूर, आणि निराधार उपस्थित होते. आम्ही आमचा हक्क व अधिकार मागतोय, सोयाबीनचा एकरी ३५ हजार खर्च अन् उत्पन्न १५ हजार. त्यामुळेच शेतकरी आत्महत्या करीत आहे. सरकारचे धोरण शेतकरी विरोधी असल्याने सोयाबीनला ४५०० भाव मिळतो. १८ जानेवारीपर्यंत वरील मागण्या मान्य न झाल्यास १९ जानेवारीला मुंबई, गुजरातला रेल्वे जाणार नाहीत. शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी माझा जीवही गेला तरीही चालेल, पण शेतकरी, शेतमजूर, निराधारांना वाऱ्यावर सोडणार नसल्याचे यांनी यावेळी सांगितले.

# मराठा आरक्षणासाठी मुंबईत एकजूट दाखवा -जरांगे पाटील

मराठा आरक्षण

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठ्यांना आता आरक्षणापासून कोणीच रोखू शकत नाही. मराठ्यांनी आरक्षणाची ८० टक्के लढाई जिंकली आहे, नोंदी मिळाल्यात आत्ता फक्त सरसकट आरक्षणासाठीची ही लढाई सुरु आहे. त्यासाठी मराठा बांधवांनो दि.२० जानेवारीला शांततेत मुंबईला जायच आहे. ताकदीने तयार रहा. लेकरांच्या डोक्यावर गुलाल टाकायची हिच खरी वेळ आहे. आपल्या धसक्याने समिती पुन्हा कामाला लागली आहे.मराठवाड्यातील एकही जिल्हा आरक्षणापासून वंचित राहणार नाही.परंतू सरसकट आरक्षणासाठीची लढाई सुरु आहे. मी कुणालाही मॅनेज होत नाही कारण मी माझ्या जातीशी गद्दारी करु शकत नाही तुम्ही फक्त एकजुट ठेवा. मराठा आरक्षणासाठीच्या लढाईसाठी संधीचे सोन करा आपले गाव आणि परिसर पिंजून काढत सर्वांना मुंबईला येण्यासाठी कळवा असे आवाहन मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आयोजीत जाहीर सभेत बोलताना केले. गेवराई शहरासह निपाणी जवळका, खांडवी, रानमळा, भाटेपुरी, अर्धमसला येथे मनोज जरांगे पाटील यांनी भेटी देवून सिरसदेवी येथे रविवार दि.१४ जानेवारी रोजी दुपारी ५ वाजता मराठा संघर्ष योध्दा मनोज जरांगे पाटील यांची जाहीर सभा झाली. यावेळी मराठा बांधवांना संबोधित करताना ते बोलत होते. यावेळी ठिकठिकाणी माता बघिनींनी त्यांचे औक्षण करुन जेसीबीतुन फुलांची उधळण करत ग्रामस्थांनी स्वागत केले. गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील जाहीर सभेत पुढे बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठ्यांनी सरकार सुतासारखे सरळ केले असून मी माझे संपुर्ण आयुष्य समाजासाठी सर्मपित केले आहे. शरिर साथ देत नाही, पण मला माहीत आहे ही शेवटची संधी आहे.गोरगरिब मराठ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आरक्षणाची गरज आहे. मी फक्त मराठ्यांचे बोलणे ऐकतो बाकीच्यांना काहीच समजीत नाही. रातपाठ एक करा आणि २० जानेवारीला मुंबईला मराठा बांधवांनी लाखोंच्या संख्येने उपस्थित रहा. माता मावल्यानों आपल्या मुलांना आशीर्वाद देण्यासाठी आंतरवाली ला या असे आवाहनही शेवटी बोलताना त्यांनी उपस्थित मराठा बांधवांना केले. यावेळी सिरसदेवी परिसरातील सकल मराठा बांधव तसेच माता बघिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. यावेळी जरांगे पाटलांच्या हस्ते बेलगुडवाडी येथील मराठा बांधवास कुणबी प्रमाणपत्र देण्यात आले.

## उत्कृष्ठ डिस्टलरी मॅनेजर पुरस्काराने वरे सन्मानीत

**माजलगाव । प्रतिनिधी**



लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याकडील आसवणी विभागाचे जनरल मॅनेजर श्री.डी.एम.यरे यांना राज्यातील उत्कृष्ठ आसवणी प्रमुख पुरस्कार जाहिर झाला आहे. साखर उद्योगामध्ये साखर व इथेनॉल या क्षेत्रात उल्लेखनीय व वैशिष्टयेपुर्ण कामगिरी करणा-या कारखान्यातील सर्व विभागांना खातेप्रमुख यांना गा. वसंतदादा शुगर इन्स्टिटयूट, पुणे या साखर क्षेत्रातील तंत्रज्ञान, संशोधन व मनुष्यबळ विकास व प्रशिक्षण यासाठी काम करणा-या खातेप्रमुख यांना या आंतरराष्ट्रीय संस्थेमार्फत विविध पुरस्कार दिले जातात. सन. २०२२-२३ या हंगामातील उत्कृष्ठ आसवणी व्यवस्थापक हा मानाचा पुरस्कार यावेळी लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचे आसवणी प्रमुख श्री.डी.एम.वरे यांना प्राप्त झाला आहे. या पुरस्काराचे वितरण दिनांक ११/१/२०२४ रोजी माजी केंद्रीय कृषी मंत्री खा. श्री. शरदचंद्रजी पवार साहेब यांच्या हस्ते तसेच मा.श्री. जयंतरावजी पाटील, मा.श्री. जयप्रकाश दांडेगावकर, मा.श्री. हर्षवर्धनजी पाटील, कारखान्याचे मार्गदर्शक मा. श्री. धैर्यशीलकाका सोळंके, चेअरमन श्री. विरेंद्रजी सोळंके यांचे उपस्थितीत पुणे येथे करण्यात आले. श्री.डी.एम.वरे हे लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्यात मागील दहा वर्षापासुन आसवणी व्यवस्थापक म्हणुन कार्यरत आहेत. मा. संचालक मंडळ व कारखान्याचे जेष्ठ मार्गदर्शक आ.श्री.प्रकाशदादा सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी मागील दहा वर्षात इथेनॉल उत्पादन वाढीसाठी बायोगॅस बॉयलर, ऑफ सिझनमध्ये उत्पन्नाचे दिवस वाढविणे या व्यतिरिक्त बी हेवी सिरप व थेट ऊसाच्या रसाचा वापर, पर्यावरण संरक्षण, प्रकल्प विस्तारीकरणसह झिरो लिक्वीड डिस्चार्ज या विविध स्तरावर वैशिष्टयेपुर्ण कामगिरी केलेली आहे. त्यांच्या कार्यकाळात सन. २०२१-२२ व सन.२०२२-२३ या वर्षात अनुक्रमे २.९२ कोटी लिटर व ३.०२ कोटी लिटर उच्चांकि इथेनॉल उत्पादन घेतलेले आहे. सहकार्यामुळेच मला हा पुरस्कार प्राप्त झालेला आहे. या कार्यक्रमाला सर्व खातेप्रमुख यांची उपस्थीती होती.

## युवासेना ठाकरे गटाची आढावा बैठक संपन्न

**बीड प्रतिनीधी:-**

शिवसेना पक्षप्रमुख तथा माजी मुख्यमंत्री उद्धवजी बाळासाहेब ठाकरे यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे,आमदार तथा मराठवाडा संपर्क नेते सुनीलजी प्रभू साहेब, उपनेत्या सुषमाताई अंधारे, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरूरकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब, लोकसभा प्रमुख माजी आमदार सुनीलजी धांडे सर, माजी मंत्री तथा सहसंपर्कप्रमुख बदामराव आबा पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली व युवासेनेचे उपसचिव खैरे व विभागीय सचिव विनायक चोते यांच्या प्रमुख उपस्थितीत आज बीड शहरामध्ये बीड जिल्हा युवासेना पदाधिकाऱ्यांची आढावा बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.

## भव्य क्रिकेट स्पर्धेचे आयोजन -आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**



आयपीएलच्या धर्तीवर आता मराठवाड्यातील खेळाची पंढरी असलेल्या आष्टी शहरात नमो चषकाचा थरार रंगणार आहे येत्या २६ जानेवारी पासून आष्टी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी खेळाडूंचा लिलाव पद्धतीने निवड करण्यात येणार आली आहे. नमो चषक २०२४ आष्टी प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धेत खेळाडूने लाभ घ्यावा असे आवाहन आ.सुरेश धस यांनी केली आहे. आयपीएल क्रिकेट स्पर्धा सर्वत्र लोकप्रिय झाली आहे याचं धर्तीवर आता आष्टी शहरात एपीएल क्रिकेट स्पर्धा रंगतदार होणार आहे. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नावाने नमो चषकाचे राज्यभरात ठिक-ठिकाणी भारतीय जनता पार्टी युवा मोर्चा यांच्यावतीने आयोजन करण्यात येत आहे.याच निमित्ताने आष्टी शहरातील आष्टी जामखेड रस्त्यालगत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराज तालुका क्रीडा स्टेडियमच्या मैदानावर येत्या दि. २६ जानेवारी पासून ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे या स्पर्धेत खेळणारे संघ हे फक्त आष्टी तालुक्यातील असणार आहेत स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ११ जानेवारीपासून नाव नोंदणीला करून दि.१३ जानेवारी रोजी आष्टी येथे याच दरम्यान खेळाडूंचा लिलाव संपन्न झाला आहे . यासाठी इच्छुक असणाऱ्या व्यापारी, कंपनीवाले मोठमोठे उद्योजक, राजकीय नेते यांनी यात सहभागी होऊन आपला संघ आपले खेळाडू लिलावात बोली लावण्यासाठी सहभागी होऊ शकतात असे आवाहन आष्टी प्रीमियर लीग संयोजक समितीने केले आहे. ही स्पर्धा यशस्वी व्हावी म्हणून दर्जेदार खेळपट्टी मैदानाचे काम सध्या वेगाने सुरू आहे . विधान परिषदेचे आमदार सुरेश धस यांच्या वतीने खास नमो चषकाचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत प्रथम पारितोषिक १ लाख रुपये द्वितीय पारितोषिक ७१ हजार तृतीय पारितोषिक ४१ हजार उत्तेजनार्थ बक्षीस २१ हजार अशा चार बक्षीसांचा समावेश आहे.आष्टी प्रीमिअर लीग नमो चषक २०२४ मध्ये तालुक्यातील खेळाडूंनी मोठ्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन विधान परिषदेचे आमदार सुरेश धस यांनी केले आहे.

## डॉ.आंबेडकर यांच्या नावामुळे विद्यापीठाची शैक्षणिक गुणवत्ता वाढली

**माजलगाव । प्रतिनिधी**

डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव विद्यापीठाला दिल्यामुळे विद्यापीठाची शैक्षणिक उंची वाढली असल्याचे प्रतिपादन डॉ. कमलकिशोर लड्डा यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर व श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विशेष युवक-युवती शिबिर मोजे जायकोवाडी येथे संपन्न होत आहे. त्या ठिकाणी *विद्यापीठ नामविस्तार दिन* साजरा करण्यात आला त्याप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना तसेच मंचावर डॉ.उमेश साडेगावकर, प्रा.जिजाराम बागल यांची उपस्थिति होती. पुढे बोलताना ते म्हणाले की, विद्यापीठाच्या नामविस्ताराचा संघर्ष हा खूप मोठा आहे. यासाठी बऱ्याच लोकांनी आपल्या प्राण्याची आहुती देखील दिली आहे. मराठवाडा विद्यापीठास डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचेनाव मिळावे यासाठी खूप मोठा संघर्ष समाजास करावा लागला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारख्या महान विभूतीचे नाव या विद्यापीठास मिळाल्यामुळे निश्चितच विद्यार्थ्यांच्यामध्ये देखील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासारखी विचारसरणी रूजत चालली आहे.

## धारुर पशुवैद्यकीय दवाखाना नवीन इमारतीचे भूमिपूजन संपन्न

**किल्लेधारूर । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांनी धारूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या आग्रही मागणीनुसार मंजुरी दिलेल्या ४० लक्ष किमतीच्या अत्याधुनिक पशुवैद्यकीय दवाखाना नवीन इमारत बांधकामाचे भूमिपूजन जिल्हाप्रमुख सचिन मुळूक यांच्या हस्ते संपन्न झाले यामुळे शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण पसरले आहे. किल्ले धारूर येथील गेली पंधरा वर्षांपासून पशुवैद्यकीय दवाखाना जिर्ण झालेला होता तालुक्यातील शेतकरी बांधवांना गळक्या व पडझड झालेल्या याच दवाखान्यात अपुऱ्या सुवीधेवरच उपचार घ्यावे लागत होते, परंतु यासाठी कोणीही पुढे येत



नव्हते हि बाब धारूर तालुक्यातील काही शेतकऱ्यांनी शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळुक यांना सांगितले असता शेतकऱ्यांच्या व त्यांच्या पशुधनाच्या हितासाठी मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब यांच्या कडे पाठपुरावा केला व चाळीस लक्ष रुपये निधी मंजूर करुन घेतला. दिनांक १४ जानेवारी २०२४ रोजी जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळुक यांच्या हस्ते करण्यात आल्याने शेतकरी बांधवात आनंदाचे वातावरण पसरले या वेळी सोबत जिल्हा संघटक नवले तालुकाप्रमुख पंजाबराव देशमुख प्रमुख पाहुणे म्हणून बाजार समितीचे उपसभापती सुनील भाऊ शिंगारे प्राध्यापक विजय शिंगारे माजी उपनगराध्यक्ष आवेश भाई खुरेशी राष्ट्रीय कॉंग्रेस चे तालुका अध्यक्ष सिध्देश्वर रंदवे उपस्थित होते. शहरतील व ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या पशुधनाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी पशुवैद्यकीय दवाखाना नवीन इमारत होत असल्याने शेतकरी व सर्व स्तरातून मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व शिवसेना जिल्हाप्रमुख सचिन भैय्या मुळुक यांचे अभिनंदन होत आहे.

## न.प.निवडणूकीसाठी शिवसेनेची मोर्चेबांधणी

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्राचे लोकप्रिय मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे साहेब यांचे हात बळकट करण्यासाठी व शिवसेना पक्ष जिल्ह्यात विस्तारीत करण्यासाठी जिल्हाप्रमुख कुंडलिक खांडे यांनी नवीन वर्षात मोहिम हाती घेतली आहे.प्रत्येक समाजातील लोकांना न्याय मिळाले पाहिजे या भूमिकेतून जिल्हाप्रमुख खांडे यांनी अल्पसंख्यांक आघाडी मजबुत करण्याच्या उद्देशाने बीड शहरातील सामाजिक कार्यकर्ते कामरान खान मोहब्बत खान यांची अल्पसंख्यांक आघाडीच्या जिल्हाप्रमुखपदी नियुक्ती केली आहे. अल्पसंख्यांक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सईद खान यांच्या पाथरी येथील संपर्क कार्यालयात सोमवार दि.१५ जानेवारी कामरान खान यांची निवड करण्यात आली. जिल्हाप्रमुख खांडे यांनी आतापासूनच बीड नगर पालिका निवडणूका डोळ्यासमोर ठेवत पक्ष बांधणीला प्रारंभ केला आहे. खान यांच्या निवडीने शिवसेनेला लोकप्रिय मुस्लीम चेहरा मिळाल्याचे दिसते. शिवसेना पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी प्रत्येक गावागावात संघटन कार्य पोहचविण्यासाठी प्रत्येक समाजातील लोकांना न्याय मिळाले पाहिजे.

## जिल्हाधिकारी यांच्या आदेशाला केराची टोपली

**पाटोदा । वृत्तसंस्था**

गतवर्षी पावसाने ओढ दिल्याने जिल्ह्यात आगामी काळात चारा आणि पाणी टंचाईचे संकट ऊभा राहणार असल्याने जिल्हाप्रशासना मार्फत संभाव्य टंचाईच्या अनुषंगाने उपाययोजना सुरू असुन तलावातील पाणीसाठा पिण्यासाठी आरक्षित करून मागणी व गरजेनुसार विंधन विहिरी व विहिरींचे अधिग्रहण करण्यात येत असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात येत असले तरी वस्तुस्थिती वेगळीच असुन पाटोदा तालुक्यातील साठवण तलावातुन सर्रास अवैधरित्या पाणी उपसा सुरूच असुन जिल्हा प्रशासन केवळ कागदी घोडे नाचवण्याचे काम करत असुन सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ डॉ.गणेश ढवळे यांच्या तक्रारीनंतर त्याची दखल घेत निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार पाटोदा यांना साठवण तलावातील पाणी साठ्यांचा कोणत्याही परिस्थितीत पाणी उपसा होणार नाही याची दक्षता घ्यावी असे आदेश दिले आहेत मात्र या आदेशाला केराची टोपली दाखवल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे तातडीने अवैधरित्या पाणी उपसा बंद करून जबाबदार आधिका-यांवर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी तक्रार जिल्हाधिकारी बीड यांना डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे. पाटोदा तालुक्यातील धनगरजवळका आणि कुटेवाडी येथील साठवण तलावातुन सध्या अवैधरित्या पाणी उपसा सुरूच असुन तलावात मोटारी आणि इंजिनच्या सहाय्याने सर्रास पाणी उपसा सुरूच आहे.आकडे महसूल व महावितरणचे अधिकारी व कर्मचारी जाणिवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचे दिसून येत आहे.

# ईव्हीएमद्वारे निवडणूका न घेता बॅलेट पेपरवर निवडणूका घ्या

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

एक देश, एक निवडणूक याबाबत अंबाजोगाईत संविधानप्रेमी नागरिक एकवटले आहेत. याप्रश्नी रविवारी बैठक घेऊन सोमवार, दिनांक १५ जानेवारी रोजी हरकती, सूचना मांडणारे एक प्रातिनिधिक स्वरूपातील निवेदन मा.रामनाथ कोविंद (माजी राष्ट्रपती तथा अध्यक्ष, एक देश, एक निवडणूक विचारार्थ समिती, नवी दिल्ली) यांना उपजिल्हाधिकारी, अंबाजोगाई यांच्या मार्फत देण्यात आले आहे. एक देश, एक निवडणूक या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर अंबाजोगाई शहरातील संविधानप्रेमी नागरिक एकवटले आहेत. याप्रश्नी रविवारी बैठक घेऊन सोमवारी प्रातिनिधिक स्वरूपात एक निवेदन देण्याचे सर्वानुमते ठरले. दिलेल्या निवेदनात एकूण १८ विविध सुचना व हरकती नमूद करण्यात आल्या आहेत. ज्यात निवडणूक प्रक्रिया ही कोणत्याही राजकीय हस्तक्षेपाशिवाय अत्यंत गोपनीय, पारदर्शक पद्धतीने राबविणे, निवडणूक प्रक्रियेतील सर्व गैरप्रकार रोखणे, मतदार संघाची पुनर्रचना करणे, अनुसूचित जाती-जमातीची लोकसंख्या वाढली असून त्याप्रमाणात राखीव



जागांमध्ये वाढ करावी, क्रिमिनल प्रोसिजर कोडमध्ये बदल करणे, निवडणूक प्रक्रिया प्रभावीपणे राबविण्यासाठी कुशल मनुष्यबळ उपलब्ध करणे, मतदारसंघाचा विकास, विकास निधी, खासदार, आमदार यांना प्रतिनिधीत्व करण्यास मर्यादा, कायद्याने बंधन आणणे, खासदार, आमदार यांचे पेंशन बंद करणे, संविधानातील पूर्वीच्या तरतुदीनुसार निवडणूक आयुक्ताच्या नियुक्तीसाठी सर्वोच्च न्यायालयाचा एक प्रतिनिधी असावा, ईव्हीएम मशिनद्वारे निवडणूका न घेता बॅलेट पेपरवर निवडणूका घेतल्या जाव्यात, भारतीय लोकशाही ही जगातील सर्वात मोठी शासनप्रणाली असून ती भारतीय संविधानामुळे यशस्वी झाली आहे हे लक्षात घेऊन संविधानाचे पावित्र्य जपले पाहिजे, लोककल्याण हेच संविधानाचे लक्ष्य आहे. हे सरकारने लक्षात ठेवले पाहिजे. अशा एकूण १८ विविध विस्तृत सुचना व हरकतींचा निवेदनात समावेश आहे. सदरील निवेदनावर ज्येष्ठ संपादक प्रा.नानासाहेब गाठाळ, माजी आमदार पृथ्विराज साठे (राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष - शरद पवार गट), सामाजिक कार्यकर्ते ॲड.अनंतराव जगतकर, ज्येष्ठ नेते प्रा.एस.के.जोगदंड, कॉ.बब्रुवाहन पोटभरे (सीपीएम), प्राचार्य डॉ कमलाकर कांबळे, प्रा.डी.जी.धाकडे, भाई मोहन गुंड (शेकाप), संयोजक ॲड.माणिक आदमाने (बीआरएसपी), ॲड.शिवाजी कांबळे (समाजवादी पक्ष), लंकेश वैद्य, सुखदेव भुंबे, बगाडे, भगवान ढगे, उत्तम जोगदंड, प्रा.संभाजी बनसोडे, जोगदंड, वडमारे, ज्ञानोबा रोकडे, व्यंकटेश चामनर, भारत वेडे, परदेशी, ॲड.सुनिल सौंदरमल, निखिल शिंदे, सोनवणे, सुधाताई जोगदंड, सुचिता सोनवणे, बनसोडे, पुष्पा बगाडे, विजया कांबळे, ए.आर.नंदनवरे, आश्रूबा कांबळे, वसंत वाघमारे, व्यंकट वेडे, ई.सी.सुरवसे, किरण सोनवणे, माधव काळे, धन्वे, दहिवाडे, विलास जोगदंड, राजु शिंदे, जोगदंड, लक्ष्मण भोकरे यांच्यासह अनेक संविधानप्रेमी नागरिकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

## राष्ट्र चेतना दौड स्पर्धेत खेळाडूंचा उत्स्फूर्त सहभाग

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा आणि वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्र चेतना दौड स्पर्धेत महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातून आलेल्या खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या स्पर्धेचे यंदाचे हे दुसरे वर्ष होते. दरवर्षी घेण्यात येणाऱ्या या स्पर्धेमुळे अंबाजोगाई तालुक्यातील खेळाडूंना नवउर्जा मिळत आहे. आगामी काळात मतदारसंघातील खेळाडूंना संधी मिळवुन देण्यासाठी वसुंधरा सेवा प्रतिष्ठान व्यासपीठ निर्माण करूनच देणार असल्याची ग्वाही अक्षय मुंदडा यांनी दिली. विजेत्याचे अभिनंदन करताना स्पर्धेत जय-पराजयापेक्षा घेतलेला सहभाग उल्लेखनीय असतो या शब्दांत त्यांनी खेळाडूंचे कौतुक केले. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती निमित्त वसुंधरा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने अंबाजोगाईशहरात राष्ट्रचेतना दौडस्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेसाठी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक ते संत भगवानबाबा चौक व परत छत्रपती शिवाजी महाराज चौक हा पाच किमी अंतराचा मार्ग निवडण्यात आला होता. या राष्ट्रचेतना दौड स्पर्धेत महाराष्ट्राच्या कानाकोपर्यातील जवळपास दोन हजार खेळाडूंनी सहभाग नोंदवला होता. स्पर्धकांमध्ये मुली, महिलांची संख्या लक्षणीय होती हे विशेष. १८ ते ३०, ३१ ते ४५ आणि ४६ ते ६० अशा वयोगटात पुरुष आणि महिलांच्या स्वतंत्र स्पर्धा घेण्यात आल्या. स्पर्धकांसाठी जागोजागी पिण्याच्या पाणी, एनर्जी ड्रिंक आदीची सोय करण्यात आली होती. तसेच आपत्कालीन परिस्थितीसाठी रूग्णवाहिका देखील तयार ठेवण्यात आल्या होत्या. स्पर्धेच्या पूर्ण मार्गावर पोलीस बंदोबस्त तैनात ठेवण्यात आला होता. स्पर्धकांच्या अतिशय जोशपूर्ण प्रतिसादात या सार्ध पार पाडळ. अतिशय या स्पर्धेचे यशस्वी नियोजन वसुंधरा प्रतिष्ठानचे अध्यक्ष मुंदडा, जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा आणि त्यांच्या संपूर्ण टीमने केले होते.